भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2017 ◑ SH 504807

अनुक्रमांक ९६६६६ दि. २५/०१/१८ १००/-

मुद्रांक कोणत्या कारणासाठी घेतला आहे करार

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे अनुच्छेद क्र. ........

संपूर्ण नांव अध्यक्ष सचिव

संपूर्ण पत्ता मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्था

हस्ते व्यक्तीचे नांव व संपूर्ण पत्ता मंचर बाळासाहेब धोंडीभाऊ पोखरकर

मुद्रांक धारकाची / हस्ते व्यक्तीची सही ........

उप कोषागार अधिकारी, आंबेगाव
19 JAN 2018
उप कोषागार अधिकारी आंबेगाव

विठ्ठल मारुती बाबुते
परवाना धारक मुद्रांक विक्रेता, प.क्र. ...
परवान्याची मुदत दि. ३१ मार्च २०१...
* आंबेगाव जि. पुणे *

— : करारनामा :— 681

करारनामा आज वार मंगळवार, तारीख २८ माहे मार्च सन २०१८ इसवी ते दिवशी २८ मार्च 2029 पर्यंत

| | |
|---|---|
| **मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था,**<br>नोंदणी रजि.नं. महा १०९/२०१८ पुणे<br>मुख्य कार्यालय — मंचर,<br>ता. आंबेगाव, जि. पुणे.<br>शाखा —<br>तर्फे अध्यक्ष —<br>श्री बाळासाहेब धोंडिभाऊ पोखरकर,<br>उ.वय ३४ वर्षे, धंदा — व्यवसाय,<br>रा. पिंपळगांव खडकी, ता. आंबेगाव,<br>जि. पुणे. | लिहून घेणार |

यांसी ...

हॉस्पीटल नाव — हांडे मुलांचे हॉस्पिटल.
डॉक्टर श्री विनोद हांडे
पदवी — B.A.M.S., M.D.
उ.वय ३२ वर्षे, धंदा — वैद्यकिय व्यवसाय,
मोबाईल क्रमांक — ७७०९६०२३०३
पत्ता — शिवाजी चौक नारायणगाव.

याकामी करारनामा लिहून देतो की,

करारनामा लिहून घेणार 'मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था' ही सामाजिक उपक्रम राबविणारी संस्था नव्याने उदयास आलेली आहे. सदर संस्थेचे प्रमुख उद्दीष्ट हे केवळ सामाजिक उपक्रम राबविणे आणि त्यातून सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक असलेल्या वैद्यकिय गरजांची सवलतीच्या दरात सर्वोतोपरी पूर्तता करणे हे आहे. त्याचबरोबर सदर संस्थेच्या माध्यमातून गरजू व गोरगरीब नागरिकांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे, समाजाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या समाजोपयोगी गरजांची शक्य तितक्या चांगल्या पध्दतीने व दर्जात्मक स्वरूपात पूर्तता करण्याचे कार्य सदर संस्थेच्या माध्यमातून करावयाचे सदर संस्थेचे मूळ उद्दीष्ट आहे. सामाजिक बांधिलकीचे भावनेतून संस्थेचे अध्यक्ष श्री बाळासाहेब धोंडिभाऊ पोखरकर यांनी सदर 'मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थे'ची सुरूवात केली आहे.

सदर सेवाभावी संस्था ही संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये मान्यताप्राप्त संस्था आहे. सदर संस्थेचा परवाना संस्थांचे सहाय्यक निबंधक यांचेमार्फत सदरचे सेवाभावी संस्थेस प्राप्त झाला आहे.

सदर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून वेगवेगळया ठिकाणच्या दवाखाना/हॉस्पीटल यांना जोडण्याचा व त्यांचेमार्फत रूग्णांना सवलतीच्या दरात उपचारांची सुविधा देण्याचा विशेष प्रयत्न सदर संस्थेच्या माध्यमातून करणेचा संस्थेचा मानस आहे. त्या दृष्टीने विशेषत: आंबेगाव, खेड आणि जुन्नर या तालुक्यांबरोबरच संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे मर्यादेपर्यंत सदर संस्थेचे कार्यक्षेत्र राहणार आहे.

सदर संस्थेच्या माध्यमातून समाजातील कुटूंबांना सभासद करण्यात येणार आहे. संस्थेच्या कार्यप्रणालीकरिता सभासदत्वाचे देयक/निधी हा कुटूंबातील व्यक्तीपरत्वे आकारण्यात येणार आहे. सदर निधीचा / देयकाचा लाभ हा सदर सभासदत्व मिळणा--या कुटूंबातील वैद्यकिय उपचारांची आवश्यकता असलेल्या सदस्यास मिळणार आहे.

संस्थेच्या उद्दीष्टपूर्तीचे अनुषंगाने, दवाखाना / हॉस्पीटलचे व्यवस्थापन सदर संस्थेस जोडण्यात येणार आहे. प्रस्तुतची संस्था, संस्थेचे सभासद कुटूंब व जोडण्यात आलेले सर्व दवाखाने/हॉस्पीटल

यांची एकत्रित सांगड घालून सदर संस्थेचे कामकाज चालविणेचा संस्थेचा सामाजिक हेतू आहे.

संस्थेच्या माध्यमातून जोडण्यात येणा—या दवाखाना / हॉस्पीटल प्रशासनाकडून संस्थेच्या कार्यासाठी कोणत्याही प्रकारचा निधी आकारला जात नाही.

संस्थेला जोडण्यात येणा—या दवाखाना / हॉस्पीटलचे व्यवस्थापनाकरिता संस्थेच्या उदद्दीष्टास अनुसरून काही अटी व शर्ती ठरविण्यात आल्या असून, त्या खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १ | मैत्री हेल्थकेअर सुविधेसाठी वैद्यकिय हॉस्पीटल व डॉक्टर आणि मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांचा फॅमिली सवलतीचा ~~पाच~~ तीन वर्षाचा लेखी स्वरूपात करार राहील. |
| २ | मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून येणा—या फॅमिली सभासद कार्डधारक रूग्णाला प्रथम (८) तपासणीसाठी सुरूवातीची रू. १००/— फी माफ करावी लागेल व तो फॅमिली सभासद ऑनलाईन अथवा ऑफलाईन ॲडमिट असल्यास त्यास एकूण बिलावरती १५ टक्के सवलत देण्यास मी तयार आहे व सदर शर्त आमचेवर बंधनकारक राहील. त्याबाबत आम्ही कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार येवू देणार नाही. |
| ३ | मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून मैत्री हेल्थकेअरचा कोणताही सभासद ऐनवेळी अध्यक्षांचे किंवा संस्थेच्या अध्यक्षांनी नियुक्त केलेल्या पदाधिका—याचे संपर्कातून हॉस्पीटलमध्ये कोणत्याही प्रकारचे उपचाराकरिता आलेस त्यास देखील बिलाचे रक्कमेत १५ टक्के सवलत असतानाच, सर्जरी पॅकेज व प्रथम तपासणीचे दरामध्ये लाभ राहील. |
| ४ | मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून मैत्री हेल्थकेअर फॅमिली सभासदाचा मेडिक्लेम सोडून रेफर डॉक्टर अथवा इतर कोणत्याही कंपनीचा इन्शूरन्स असल्यास परंतू त्या फॅमिली सभासदाला होणा—या बिलावरती १५ टक्के सवलत व इतर सुविधांचा लाभ द्यावा लागेल. |
| ५ | मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून आपल्या हॉस्पीटलला ऑनलाईन अथवा ऑफलाईन सुविधा घेण्यासाठी फॅमिली सभासद आल्यास त्याची पूर्वकल्पना एस.एम.एस. अथवा कॉल करून दिली जाईल. |
| ६ | मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून फॅमिली सभासदाला एकुण बिलावर १५ टक्के सवलत अनिवार्य राहील. त्या अतिरिक्त अधिक सवलत देणार असल्यास त्यास वैद्यकिय डॉक्टर त्यांच्या वैयक्तिक पातळीवर निणर्य घेवू शकतात. त्याबाबतचा निर्णय घेणेचे अधिकार संबंधित हॉस्पीटल प्रशासनास/डॉक्टरांना राहील. |

| | |
|---|---|
| ७ | मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था व वैद्यकिय हॉस्पीटल डॉक्टर यांनी एकमेकांशी एका विचाराने राहणे बंधनकारक राहतील. एकमेकांची चुकीची माहिती संस्था व डॉक्टर हॉस्पीटल यांनी दिल्यास संस्था किंवा डॉक्टर जबाबदार राहील. इतर कोणीही चुकीची माहिती, अफवा कोणत्याही माध्यमातून पसरविल्यास अथवा पसरल्यास त्यावर संस्थेने व डॉक्टरांनी विश्वास ठेवू नये, त्याकरिता संस्था व डॉक्टरांनी एकमेकांशी एकनिष्ठ राहणे दोघांचेही हितावह आहे. |
| ८ | मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून १५ टक्के सवलत मिळणा—या रूग्णाला सर्व प्रकारच्या आजारांवर, व्याधींवर बंधन राहणार नाही. कोणताही आजार असल्यास त्या रूग्णाला १५ टक्के सवलत राहील. केवळ संस्थेच्या माध्यमातून प्रसिध्द् करण्यात येणा—या कमी खर्चातील सर्जरी अथवा शस्त्रक्रिया आजारांचे यादीचे व्यतिरिक्त सदरची सवलत राहील. लिस्टेड आजारांवरील उपचार घेणारा रूग्ण १५ टक्के सवलतीचे दरास पात्र राहणार नाही. |
| ९ | मी स्वत: म्हणजेच डॉक्टर व मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांच्याशी झालेल्या वैयक्तिक चर्चा पूर्वकल्पना, नियम व अटी या आमच्या वैक्तिक पातळीवरती राहतील. |
| १० | मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थांच्या वतीने जोडलेल्या कुटूंबांची माहिती/ॲडमिट झालेल्या पेशंटची माहिती व बिलींग अकौंट व संस्थेचे कामकाज पर्सनल आयडी देवून दर महिन्याला स्वत:ला पाहणेचा अधिकार स्वत: डॉक्टरांना राहील. अशी संस्थेने खात्री दिली आहे. |
| ११ | मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून मी/वैद्यकिय डॉक्टरांनी ॲडमिट होणा—या रूग्णाला शस्त्रक्रिया अथवा सर्जरीबाबत डॉक्टरांनी जाहीर केलेली कमी खर्चातील यादी प्रमाणे आकारणी केली जाईल. |
| १२ | मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून स्पेशल ऑफर पॅकेज सेवा घेणा—या रूग्णाला किंवा सभासदाला वेबसाईटवर किंवा माहितीपत्रकावर कमी खर्चात दिलेल्या आजार आणि सर्जरी यांच्या ना नफा ना तोटा या रकमेनुसार उपचार केले जातील. परंतू त्यावर १५ टक्के सवलत सभासदाला देता येणार नाही. |
| १३ | मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून फॅमिली सभासदाचा मेडिक्लेम अथवा इतर कंपनीचा इन्शूरन्स असल्यास त्या सभासदाला मैत्री हेल्थ केअर किंवा इतर इन्शूरन्स कंपनीपैकी सभासदाच्या मागणीनुसार एकाच सवलतीचा लाभ घेता येईल. |

| | |
|---|---|
| १४ | मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून संस्थेच्या सभासद असणाऱ्या रुग्णाला सर्वसाधारण आजारासाठी १५% सवलत व सर्जीकल पॅकेज लिस्ट सोडून इतर होणाऱ्या कोणत्याही सर्जरीसाठी सर्जरीच्या एकुण बिलावरती २०% सवलत मी (डॉक्टर) देण्यास तयार आहे. |
| १५ | मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून दिलेल्या (जाहिर केलेल्या) मी माझ्या हॉस्पिटलची सर्जीकल लिस्ट संस्थेच्या नियमानुसार माझ्या हॉस्पिटलचा विचार करुन व चर्चा करुन ती फायनल लिस्ट पाठीमागे जोडली आहे. |
| १६ | मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून वैद्यकीय सेवा घेणाऱ्या रुग्णाला संस्थेच्या नियमानुसार जुन्नर, आंबेगाव, खेड शहरांसाठी सर्वसाधारण आजारासाठी १५% सवलत व चाकण ते पुणे शहर पर्यंत २०% सवलत लागू राहिल. जुन्नर, आंबेगाव, खेड शहरांसाठी सर्जीकल पॅकेज सोडून इतर होणाऱ्या सर्जरी बिलावरती २०% सवलत लागू राहिल. चाकण ते पुणे शहर पर्यंत २५% सवलत लागू राहिल. |
| १७ | मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून रुग्णांना डॉक्टरांच्या सल्यानुसार, गरजेनुसार व हॉस्पिटलच्या उपलब्ध सुविधेनुसार अतिदक्षता विभाग, जनरल वार्ड, स्पेशन रुम, डिलक्स रुम व इतर सुविधा देण्यासाठी सहकार्य करणे गरजेचे आहे. त्यातून संस्थेचा हेतू साध्य व सफल होणेस मदत होणार आहे. |
| १८ | वैद्यकीय सेवेतून जनसेवा हिच ईश्वरसेवा असे मानून आपण सर्वांनी चांगले, उत्कृष्ठ व दर्जात्मक कार्य करणेस, गरजूंना आवश्यक असलेली सुविधा पुरविणे आणि तदनुषंगिक इतर मदत करणेस सदैव तत्पर असणे आवश्यक आहे. |

वर करारनाम्यामध्ये नमुद केलेला संपूर्ण मजकूर आम्ही लिहून देणार आणि लिहून घेणार यांनी वाचून, समजून उमजून त्यावर राजीखुशीने व अक्कलहुशारीने स्वाक्षरी केली असे.

परिशिष्टामध्ये सर्जरी/शस्त्रक्रिया लिस्ट/माहितीपत्रक जोडले आहे.

वरील माहिति चुकीची आढळून असल्याचे आढळून आल्यास मी भारतीय दंड संहिता कलम १९३, १९९/२ व २०० अन्वये कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

लिहून घेणार

मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेतर्फे

अध्यक्ष

लिहून देणार

नाव विनोद हांडे

HANDE CHILDREN'S HOSPITAL
Reg.No.2016/10/Feb.01
Shivaji Chowk,Narayangaon,
Dist Pune-410504

G81.

1268180327000699052 9

Affidavit No :
17521418712685003999 14

Applicant Name : **Vinod Hande**

Tehsil Name : **Ambegaon**



Date : **27/03/2018**

Signed and Sworn before by **Shri Vinod Hande** who is personally known to me or who has been identified by Shri / Smt / Kumari **Sharadrao Shinde** whose signature is hereby appended.

Signature Of Identifier
**Sharadrao Shinde**

Tehsildar
**Ambegaon**
Date : **27/03/2018**

**Executive Magistrate**
**C O.Manchar,Tal.Ambegaon**

रजि.नं.महा.१०९/२०१८ पुणे

# मैत्री हेल्थ केअर

## सेवाभावी संस्था, मंचर

## प्रमाणपत्र



हांडे चिल्ड्रन हॉस्पिटल, नारायणगाव.

यांना प्रमाणित करण्यात येत आहे कि मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्थेचे प्रायव्हेट अधिकृत वैद्यकिय सेवा देणारे डॉ. विनोद हांडे. यांना प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

### मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्था खालीलप्रमाणे सुविधा

| संस्थेच्या नियमानुसार दिली जाणारी आरोग्य सवलत | वैद्यकिय क्षेत्रातील दिली जाणारी रूग्णांच्या उपचारासाठी नुकसान भरपाई |
|---|---|
| १) ओ.पी.डी. तपासणी फी ५०% माफ | ५०/– रूपये पर कुपन |
| २) रक्त तपासणी १०% ते २०% | ५ ते १०% |
| ३) मेडीकल सुविधा १०% ते १५% | ५ ते १०% |
| ४) हॉस्पिटल अटॅच सानोग्राफी/एक्स रे ५% ते १०% | ५ ते १०% |
| ५) नॉरमल डिलिव्हरी ५०% | ३० ते ५०% |
| ६) रूग्णवाहीका सेवा ५०% | ३०% |
| ७) रक्तपुरवठा लॅब ५०% | ३०% |
| ८) जनरिक मेडिकल ५०% | २०% |
| ९) शस्त्रक्रिया बार्गेनिंग ५% | ५% |
| १०) डायग्नोस्टिक सेंटर २०% | १०% |
| ११) सर्व साधारण आजार व इतर ॲडमिट बील १५ ते २०% | ०% |
| १२) अंध अपंग/मुकबधिर उपचारच्या दरात ५०% | २० ते ३०% |
| १३) घरपोच डॉक्टर सेवा ५०% | ५०% |
| १४) गरजु घरगुती रूग्णांसाठी ऑक्सिजन सेवा १००% | १००% |
| १५) जेवणाचा डब्बा १००% | १००% |
| १६) हेल्थ बॉडी चेकअप ५०% | ३० ते ५०% |
| १७) शासकिय सरकारी योजना १००% | ०% |
| १८) ५०% तील हॉस्पिटल | २५ ते ५०% |
| १९) विमा संरक्षण आपघाती मृत्यू १००% नियम व अटी | १००% |
| २०) आरोग्य शिबीर १००% | ०% |
| २१) १० तासातील आतील ॲडमिट रूग्णांना उपचार १५ ते २०% | १० ते १५% |

**वरील सुविधांचा लाभ घेणाऱ्या रूग्णांसाठी वरील नुकसान भरपाई प्रमाणपत्र संस्थेच्या झालेल्या करारानुसार देण्यात येत आहे.**

* वरील प्रमाणे किंवा करारानुसार झालेली नुकसान भरपाई १ ते १० तारखेपर्यंत बँक खात्यावर जमा केली जाईल *

सचिव

HANDE CHILDREN'S HOSPITAL
Reg.No.2016.10/Feb.01
Shivaji Chowk,Narayangaon,
Tal.Junnar,Dist.Pune-410504

अध्यक्ष

वैद्यकीय व्यवसायाचे नाव : Vinod Hande Childrens Hospital

व्यवसायाचा पत्ता : Hande Childrens Hospital, Shivaji chowk, Narayangaon

डॉक्टरांचे/सुविधाधारकाचे नाव : Dr. Vinod Hande.

पदवी : M.D. (ped.) लॅन्डलाईन नं. ............ मोबाईल नं. 8605515808

OPD/प्रथम तपासणी फी : 70 फेरतपासणी फी : 70

(वैद्यकीय क्षेत्रातील नुकसान भरपाई/आर्थिक देवाण-घेवाणीसाठी आपणाकडून बँकेची माहिती घेत आहोत.)

| | |
|---|---|
| बँक खातेदाराचे नाव : Vinod Vitthal Hande | |
| बँकेचे नाव : S.B.I. | शाखा : Narayangaon. |
| खाते (A/c) नंबर : 30970692287 | IFSC कोड : SBIN0011130 |

मागील करारानुसार/अनुसरून वैद्यकीय क्षेत्रातील सर्व सुविधा देणारे हॉस्पिटल / मेडिकल / रक्त तपासणी लॅब / रक्त पुरवठा लॅब / दवाखाना / सोनोग्राफी / x-ray / डायग्नोस्टीक सेंटर / रुग्णवाहिका / जनरिक मेडिकल / शस्त्रक्रिया बार्गेनिंग व इतर सर्व सुविधांवर सर्व वैद्यकीय क्षेत्रातील हितचिंतकांनी दिनांक ०४ मार्च २०१८ ते ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत ज्या आरोग्य सुविधा मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या येणाऱ्या नोंदणीकृत सभासदांना सवलतीच्या दरात ना नफा, ना तोटा या तत्वावर उपलब्ध करून दिल्या व संस्थेला सहकार्य केले. त्याच सहकार्यातून मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था अध्यक्ष बाळासाहेब पोखरकर यांनी वैद्यकीय क्षेत्रातील सर्व बाजूंचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे की, खालील वैद्यकीय क्षेत्रातील दिल्या जाणाऱ्या सुविधांवर नुकसान भरपाई दिनांक ०१ जानेवारी २०१९ पासून पुढील (.........) वर्षांसाठी देण्यास मी/आम्ही तयार आहे/लागू राहतील.

- नुकसान भरपाई खालील बाबींवर दिली जाईल:

| अ. क्र. | संस्थेच्या नियमानुसार दिली जाणारी आरोग्य सवलत | वैद्यकीय क्षेत्रात दिली जाणारी रुग्णांच्या उपचारासाठी नुकसान भरपाई | सदर नुकसान भरपाई खालीलप्रमाणे आम्हाला मान्य राहील | नुकसान भरपाई मान्य असणाऱ्या अधिकृत वैद्यकीय सेवा देणाऱ्यांची सही |
|---|---|---|---|---|
| १. | OPD तपासणी फी ५०% माफ | ५०/७०/१०० रुपये/कुपन | 50 रुपये Return. | [signature] |
| २. | रक्त तपासणी फी – [ ]१० % किंवा [ ]२०% | ५ ते १०% पर्यंत | 5% return. | [signature] |
| ३. | हॉस्पिटल अटॅच/वैयक्तिक मेडिकल सुविधा – [ ] १०% किंवा [ ] १५% | ५ ते १०% पर्यंत | 5% return. मोरया मेडिकल असाय आहे. | [signature] 7888292252 |
| ४. | हॉस्पिटल अटॅच सोनोग्राफी/एक्स-रे [ ]५ किंवा [ ] १०% | ५ ते १०% पर्यंत | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | १० तासाच्या आतील ॲडमिट रुग्णांना उपचार [ ] १५ किंवा [ ] २०% | १०% पर्यंत | | |
| ६. | शस्त्रक्रिया बार्गेनिंग ५% पर्यंत (फायनल बील वेळी) | ५% पर्यंत | | |
| ७. | नॉरमल डिलिवरी ५०% कुटुंबाला वर्षातून एकदा (मुलीच्या जन्मासाठी) | ३० ते ५०% पर्यंत | | |
| ८. | सर्वसाधारण आजार/ॲडमिट बील १५% ते २०% | ०% पर्यंत | 0 % return | [signature] |
| ९. | रेफर डॉक्टर ॲडमिट बील १५% (डॉ. रेफरन्स पुरावा) | ५% पर्यंत | | |
| १०. | रुग्णवाहिका सेवा ५०% | ३०% पर्यंत | | |
| ११. | रक्तपुरवठा लॅब ५०% | ३०% पर्यंत | | |
| १२. | जनरिक मेडिकल ५०% | २०% पर्यंत | | |
| १३. | डायग्नोस्टीक सेंटर २०% | १०% पर्यंत | | |
| १४. | अंध-अपंग/मुकबधीर उपचाराच्या दरात ५०% (वर्षातून एकदा) | ३०% पर्यंत | | |
| १५. | घरपोच डॉक्टरसेवा ५०% (महिन्यातून एकदा) | ५०% पर्यंत | | |
| १६. | गरजू रुग्णांसाठी घरगुती ऑक्सिजन सेवा १००% | १००% पर्यंत | | |
| १७. | ॲडमिट रुग्णासाठी जेवणाचा डबा १००% (पहिल्या दिवशी) | १००% पर्यंत | | |
| १८. | हेल्थबॉडी चेकअप ५०% | ३० ते ५०% पर्यंत | | |
| १९. | शासकीय सरकारी योजना १००% | ०% पर्यंत | | |
| २०. | ५०% हॉस्पिटल उपचार | २५% ते ५०% पर्यंत | | |
| २१. | विमा संरक्षण अपघाती मृत्यू १००% नियम/अटी लागू | १००% पर्यंत | | |
| २२. | आरोग्य शिबीरे १००% | ०% पर्यंत | | |

वरील सुविधांचा लाभ घेणाऱ्या सभासदांसाठी वरील नुकसान भरपाई खालील नियमांनुसार बंधकारक राहील :

१) वरील दिलेल्या सवलतीची नुकसान भरपाई मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेकडून प्रत्येक महिन्याच्या १ ते १० तारखेच्या दरम्यान आपल्या खात्यावर वर्ग करण्यात येईल किंवा चेकच्या स्वरुपात दिले जाईल व ते देण्यास संस्था जबाबदार राहील. असे न झाल्यास आपण संस्थेच्या अध्यक्षांसोबत चर्चा करून पुढील सेवा देण्याबाबत निर्णय घेता येईल. तसेच दिल्या गेलेल्या नुकसान भरपाईचे (कुपन व इतर सुविधा) प्रत्येक महिन्याचे नोंदणी रेकॉर्ड संस्थेस महिन्याच्या अखेरीस कळविण्यात येईल.

२) संस्थेच्या माध्यमातून येपाऱ्या रुग्णांना मी नमूद केलेल्या आरोग्य सुविधा/सेवा (सवलतीमध्ये) देण्यास बंधनकारक राहील. त्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार राहणार नाही..

३) आरोग्य सुविधा घेण्यासाठी येणाऱ्या सभासदांजवळ संस्थेची फाईल व हेल्थ कार्ड पाहिल्यावर सभासदांची नावे व ऑनलाईन आय. डी. यांची चाचपणी केल्यावर व त्यावर नमूद असलेल्या नावांना (सभासदांना) ही सुविधा देण्यास आम्ही बंधनकारक राहू.

४) मैत्री हेल्थकेअर संस्थेच्या माध्यमातून येणाऱ्या रुग्णांकडून **OPD** कुपन/मेडिकल/लॅब व इतर सुविधा कुपन मी जमा करून त्यावरील आय.डी. नंबरची खात्री केल्यानंतर सवलतीच्या दरात संबंधित सेवा दिल्याचे रेकार्ड मी माझ्या हॉस्पीटलला तसेच संबंधित विभागामध्ये नोंद/जतन करून ठेवील.

५) **OPD**/इतर सुविधा कुपनवर मर्यादा राहणार नाही. जेवढी कुपने जमा होतील तेवढे कुपनप्रमाणे पैसे हॉस्पिटलला दिले जातील.

६) मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून येणाऱ्या सभासदांनी (रुग्णांनी) आपले हॉस्पिटल अथवा इतर सुविधांकरिता चौकशी केल्यास त्यांना आपण व आपले कर्मचारी यांनी आपले हॉस्पिटल अथवा इतर सुविधाधारक हे मैत्री हेल्थकेअर संस्थेच्या सभासदांना सेवा देण्यास जोडलेले आहे, अशी योग्य ती माहिती पुरवतील.

७) मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या नवीन येणाऱ्या आरोग्य विषयक संकल्पना, आरोग्य सुविधा हॉस्पिटलला पूर्व सूचना देऊन कळविण्यात येतील आणि त्यावर विचारविनिमय करून संबंधित संकल्पना तसेच सुविधा मान्य अगर अमान्य करण्यात येतील.

८) मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून सभासदांना (रुग्णांना) आरोग्य सेवा-सुविधा देत असताना आपल्या **OPD** फी मध्ये वाढ झाल्यास अथवा इतर कोणत्याही सुविधांचे चार्जेस/आकार वाढल्यास किंवा वाढवणार असल्यास एक महिना अगोदर त्याची पूर्वसूचना संस्थेला (अध्यक्ष) कळविणे बंधनकारक राहील.

९) मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून जर आपल्याला आपले हॉस्पिटल, मेडिकल, लॅब तसेच इतर सुविधा संस्थेच्या या करारामधून वगळायचे असल्यास अगर

बंद करावयाचे असल्यास त्याची पूर्वसूचना सहा महिनेअगोदर संस्थेला (अध्यक्ष) कळविणे बंधनकारक राहील. परंतु संस्थेशी जोडलेल्या पूर्वीच्या सभासदांना आरोग्य सुविधा देण्यास मी बंधनकारक राहील.

१०) मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रामध्ये लाभ घेणारा सभासद/रुग्ण व त्यांचे उपचार याबाबत चाचपणी/चौकशी करण्यासाठी संस्थेचे अधिकृत अध्यक्ष, संचालक किंवा पदाधिकारी आपल्या हॉस्पिटलमध्ये अगर सुविधाधारकांकडे आल्यास आपणाकडून संस्थेच्या संबंधित व्यक्तींना सहकार्य करण्यात येईल.

वरील माहिती चुकीची असल्याचे आढळून आल्यास मी भारतीय दंड संहिता कलम १९३, १९९/२ व २०० अन्वये कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

लिहून घेणार

..............................................

अध्यक्ष : मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्था

लिहून देणार

..............................................

नाव : Dr. Vinod Hande.

HANDE CHILDREN'S HOSPITAL
Reg.No.2016/10/Feb.01
Shivaji Chowk,Narayangaon,
Tal.Junnar,Dist.Pune-410504